महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१०/४३०/४६५,
ई-मेल-desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक / तात्काळ

क्रमांक : १०/एनजीपी/केंद्रीभुत प्रवेश प्रक्रिया/२०२०/ १०७८ दिनांक : 04 DEC 2020

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत...

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका संस्थांमधील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया दि.१०/८/२०२० पासून आणि थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज नोंदणीची प्रक्रिया दि.[illegible]/८/२०२० पासून सुरु करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सर्व पदविका अभ्यासक्रमांची तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक ७/१२/२०२० असून अंतिम गुणवत्ता यादी दि.१२/१२/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

अंतिम गुणवत्ता यादीनंतरच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये विकल्प अर्ज भरुन निश्चित करणे, कॅप जागा वाटप, झालेले जागा वाटप स्वीकारण्यापूर्वी स्वत: पडताळणी करणे, जागा वाटप स्वीकारणे, जागा स्विकृती शुल्क भरणे, जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उमेदवारांनी उपस्थित राहणे याबाबतचे प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक संचालनालयामार्फत जाहिर करण्यात आलेले आहे.

तरी सदर वेळापत्रकास मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी देण्यासाठी आपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्यासाठी पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्थांनी व सुविधा केंद्रांनी प्रवेश प्रकियेच्या पुढील टप्प्याची माहिती उमेदवारांना करुन द्यावी, यासाठी जनजागृती मोहिम, करिअर काऊंसिलींग, आकाशवाणी केंद्रावर मुलाखती/ प्रसिध्दी अशा प्रकारचे उपक्रम राबवावेत.

२) प्रत्येक संस्था प्रमुखांनी विकल्प अर्ज भरण्याच्या टप्प्याबाबतची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर वैयक्तीकरित्या द्यावी.

३) संचालनालयामार्फत जाहीर करण्यात आलेले प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक सर्व संस्था/सुविधा केंद्रांवर विद्यार्थी व पालक यांच्या तात्काळ निदर्शनास येईल अशा ठिकाणी प्रदर्शित करण्याच्या सूचना प्राचार्यांनी संबंधितांना द्याव्यात.

४) प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी व संबंधीत संस्थांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

५) संस्थांनी त्यांच्या स्तरावरुन सदरच्या वेळापत्रकाची बातमीच्या स्वरुपात स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करावी.

६) प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांव्दारे विकल्प अर्ज भरुन निश्चित करणे, त्यांना झालेले जागा वाटप, झालेले जागा वाटप स्वीकारण्यापूर्वी विद्यार्थ्यांने स्वयंपडताळणी करणे, जागा वाटप स्वीकारणे, जागा स्विकृती शुल्क भरणे, जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये विद्यार्थ्याने उपस्थित राहणे याबाबत इत्यंभुत माहिती करुन द्यावी व या संपुर्ण प्रक्रीयेमध्ये विद्यार्थ्यांना अडचणी आल्यास त्यांना संपर्क साधून त्याबाबत सर्वतोपरी मार्गदर्शन/पाठपुरावा करावा.

७) प्रवेश प्रक्रियेचे काम हे विद्यार्थी केंद्रीत असून अत्यंत संवेदनशील व जनमानसांमध्ये संचालनालयाची प्रतिमा प्रतिबिंबीत करणारे असल्यामुळे या प्रक्रियेमध्ये इच्छुक उमेदवारांना कोणत्याही अडचणी/ तक्रार येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती / औरंगाबाद / मुंबई / नागपूर / नाशिक / पुणे. त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरच्या बाबतीत त्यांचे स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करून सदर परिपत्रक आपल्या विभागातील संबंधित सर्व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुखांच्या निदर्शनास आणावे.

२) का.क्र.३, मुख्य कार्यालय,मुंबई, यांना सदर परिपत्रक संचालनालयाच्या संबंधित प्रवेशप्रक्रियेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

*E/Bhadekar/Circular reg. Adm. Procedure 20-21*

...TECHNIC
Inward No 2716